# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी
**{माहिती तंत्रज्ञान विभाग}** 150 दिवसाचा नियोजित कृती आराखडा कार्यक्रमा अंतर्गत नागरिकांना नागपूर महानगरपालिका द्वारे देण्यात येणाऱ्या सेवा अधिकाधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्या निर्देशांप्रमाणे नागपूर महानगरपालिकेचे "NMC Smart Mitra" विकसित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने, M/s Mars Telecom System, Pvt. Ltd., Hyderabad ह्यांना मनपाची ERP प्रणाली Develop व maintainance करण्याकरिता कार्यादेश देण्यात आला आहे. M/s Mars Telecom System, Pvt. Ltd., Hyderabad यांना म.न.पा. च्या ERP प्रणालीचे Development व Maintenance साठी दिलेल्या कार्यादेशाच्या अटी व शर्ती/करारनाम्यामधील Change Request Clause 5.29 अंतर्गत सदर काम Change Request वर करण्यात आले आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत नागपूर महानगरपालिकेच्या नागरिकांकरिता सेवांना एकीकृत डिजिटल ओळख प्रदान करण्याच्या दृष्टीने "NMC Smart Mitra" या नावाचे ट्रेडमार्क नोंदणी करणे गरजेचे आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका यांनी सदर नावाला मान्यता दिली असून, AI आधारित सर्व सेवांचे एकत्रित ब्रँडिंग, भविष्यातील डिजिटल उपक्रमांची एकसंधता, तसेच नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत AI सेवा प्रदान करण्याच्या दृष्टीने "NMC Smart Mitra" हे नाव इतर कोणालाही वापरात येऊ नये यासाठी यास ट्रेडमार्क स्वरूपात संरक्षित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून संबंधित कायदेशीर प्रक्रिया व ट्रेडमार्क नोंदणीची पुढील कार्यवाही सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. ट्रेडमार्क नोंदणीची प्रक्रिया करण्यासाठी सदर बाबतचा ठराव करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे, नागपूर महानगरपालिकेचे "NMC Smart Mitra" हे नाव ट्रेडमार्क म्हणून नोंदविण्यसाठीच्या प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-**

1) उक्त खर्च हे म. न. पा. च्या प्रकल्प पद क्र. A- A48200174201 मधून करण्याचे प्रस्तावित आहे.
2) सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 79/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 26/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी 150 दिवसाचा नियोजित कृती आराखडा कार्यक्रमा अंतर्गत नागरिकांना नागपूर महानगरपालिका द्वारे देण्यात

येणाऱ्या सेवा अधिकाधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांच्या निर्देशांप्रमाणे नागपूर महानगरपालिकेचे "NMC Smart Mitra" विकसित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने, M/s Mars Telecom System, Pvt. Ltd., Hyderabad ह्यांना मनपाची ERP प्रणाली Develop व maintainance करण्याकरिता कार्यादेश देण्यात आला आहे. M/s Mars Telecom System, Pvt. Ltd., Hyderabad यांना म.न.पा. च्या ERP प्रणालीचे Development व Maintenance साठी दिलेल्या कार्यादेशाच्या अटी व शर्ती/करारनाम्यामधील Change Request Clause 5.29 अंतर्गत सदर काम Change Request वर करण्यात आले आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत नागपूर महानगरपालिकेच्या नागरिकांकरिता सेवांना एकीकृत डिजिटल ओळख प्रदान करण्याच्या दृष्टीने "NMC Smart Mitra" या नावाचे ट्रेडमार्क नोंदणी करणे गरजेचे आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका यांनी सदर नावाला मान्यता दिली असून, AI आधारित सर्व सेवांचे एकत्रित ब्रँडिंग, भविष्यातील डिजिटल उपक्रमांची एकसंधता, तसेच नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत AI सेवा प्रदान करण्याच्या दृष्टीने "NMC Smart Mitra" हे नाव इतर कोणालाही वापरात येऊ नये यासाठी यास ट्रेडमार्क स्वरूपात संरक्षित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून संबंधित कायदेशीर प्रक्रिया व ट्रेडमार्क नोंदणीची पुढील कार्यवाही सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. ट्रेडमार्क नोंदणीची प्रक्रिया करण्यासाठी सदर बाबतचा ठराव करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे, नागपूर महानगरपालिकेचे "NMC Smart Mitra" हे नाव ट्रेडमार्क म्हणून नोंदविण्यसाठीच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.